**राष्ट्रीय आरोग्य अभियान - पायाभूत सविधा विकास कक्ष कार्यक्रमांतर्गत**
**वाहन भाडेतत्वावर घेण्यासाठी**
**ई -निविदा सुचना क्र ०४ ( प्रथम प्रसारण) सन २०२०-२१**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान** अंतर्गत पायाभूत सुविधा विकास कक्ष कार्यक्रमाकरीता जिल्हयातील विविध बांधकामांना भेठी देण्यासाठी महाराष्ट्रातील नोंदणीकृत बोलेरो एसी/स्कॉरपीयो एसी असलेली वाहन अकरा महिण्याकरीता भाडयाने घेण्यासाठी अधिकृत मालकाकडून ई-निविदा www.,mahatenders.gov.in या संकेत स्थळावर मागविण्यात येत आहे. निविदा सादर करण्याची दिनांक खालील प्रमाणे जाहिर करण्यता येत आहे.

सदर निविदा प्रक्रिया खालील प्रमाणे आहे

| | |
|---|---|
| वाहन निविदा प्रपत्र संकेत स्थळावर भरण्याचे दिनांक | दि. २९/०१/२०२१ रोजी सकाळी ११.०० पासून ते दि. ०४/०२/२०२१ सांय ५.०० वाजे पर्यंत |
| निविदा तांत्रीक लीफाफा उघडण्याचे दिनांक ( शक्य झाल्यास) | दिनांक ०५/०२/२०२१ |
| निविदा वित्तीय लीफाफा उघडण्याचे दिनांक ( शक्य झाल्यास) | दिनांक ०६/०२/२०२१ |

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद गोंदिया

# अटी व शर्ती

१) पासुविक अंतर्गत घेण्यात येणारे वाहण फक्त बांधकामाची पाहणी करण्याकरीताच वापरण्यात यावे.
२) बोलेरो, स्कारपीयो इत्यादी पॅक बंद बॉडी या तत्सम स्वरुपातील असणे आवश्यक आहे.
३) वाहन हे सन २०१८ अथवा नंतरची निर्मीत असणे बंधनकारक राहिल.
४) वाहनांवर नमुन्याप्रमाणे तीन ठिकाणी लोगो चिकटविणेचा खर्च वाहनधारकांनी करणेच आहे.
५) आर.टी.ओ.कडील सर्व परवाने व गाडीचा पुर्ण विमा भरलेला असणे आवश्यक आहे (Full Insurance Policy)
६) वाहनांची सर्व मुळ कागदपत्रे योग्य असलेचे प्रमाणित करणेसाठी जिल्हा कार्यालयास सादर करणे आवश्यक राहिल.
७) भाडयाचे वाहन सदैव सुस्थितीत असावे.
८) भाडयाचे वाहन २४ तास उपअभियंता, पासुविक, राआअ, यांचे अधिपत्याखाली राहिल.
९) निविदेतील दर प्रती महिन्याच्या १५०० किमी करीता नमुद करावे.
१०) इंधन, वंगण, दुरुस्ती व वाहन चालकाचा खर्च (वेतन, भत्ते, प्रवास भत्ते) इत्यादी सर्व खर्च वाहन धारकास द्यावा लागेल.
११) वाहनाचा वापर ग्रामीण भाग, डोंगराळ व अतिदुर्गम भागात केला जाईल.
१२) किरकोळ अथवा कोणतेही स्वरुपाची दुरुस्ती करणे ही मालकाची जवाबदारी राहिल.
१३) वाहन दुरुस्तीसाठी होणारी धाव कामकाजाच्या धावेत समाविष्ट करण्यात येवू नये.
१४) परिऑडीकल मेन्टनंन्ससाठी लागणारे फिल्टर्स, वंगण व मजुरी वाहनाच्या दुरुस्ती व देखभाल वाहन धारकाने करणेच आहे.
१५) वाहन केवळ मालकाच्या अकार्यक्षमतेमुळे बंद राहिल्यास व त्यामुळे कार्यक्रमावर अनिष्ट परिणाम झाल्यास निर्धारीत कंत्राट ठरल्यानंतर जे प्रतिदिवस दर येईल त्या प्रमाणे तेवढया दिवसाचे वाहन भाडे देयकातुन कपात करण्यात येईल.
१६) कोणतेही दिवशी वाहनाची प्रवासी वाहतुक अथवा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आलेस जिल्हा कार्यालयाकडून वाहन तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल.
१७) भाडयाने लावलेले वाहन जिल्हयाचा बाहेर जाऊ नये जाण्याचे असल्यास **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गोंदिया यांची** परवानगी घेण्यात यावी.
१८) भाडयाचे वाहन २४ तास नेमलेल्या मुख्यालयाचे ठिकाणी ठेवण्यात यावे.
१९) दुरुस्तीसाठी गेलेल्या वाहनांच्या ऐवजी तात्काळ बदली वाहन देणेची सर्वस्वी जवाबदारी वाहन धारकाची अथवा वाहन पुरवठा कंत्राटदाराची राहिल.
२०) वाहन धारकांनी भाडयाने वाहन लावण्यापुर्वी त्यांची तांत्रीक तपासणी करुन घेण्यात यावी.
२१) वाहन धारक अथवा कंत्राटदाराकडून उपरोक्त अटी व शर्तीनुसार रक्कम रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती बाबतचा करारनामा दोन साक्षदारांच्या स्वाक्षरीसह लिहून दयावा.
२२) वाहन धारकाने अथवा ठेकेदाराने प्रति वाहन रु.१०,०००/- इतकी अमानत / इसारा रक्कम डी.डी. व्दारे उपअभियंता, पासुविक, राआअ, जि.प. गोंदिया यांचे कार्यालयात दि. ०५/०२/२०२१ ला दुपारी १.०० वाजेपर्यंत जमा करावी अन्यथा तांत्रीक लीफाफा उघडण्यात येणार नाही.
२३) वरिल प्रमाणे भरण्यात येणारा शुल्क District Integrated Health & Family Welfare Society, Gondia या नावाने डी.डी. काढण्यात यावा.
२४) वाहनमालकाने निविदेतील अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यास रु. १०००/- दंडाची तरतूद करण्यात येईल.सदर रक्कम वाहनाचे देयकातुन कपात करण्यात येईल. तसेच काम असमाधानकारक आढळून आल्यास इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.
२५) निविदा प्रपत्राची किंमत रु. ५००/- एवढी राहील सदर रक्कम परत होणार नाही.
२६) प्रत्येक महिण्याचे लॉगबुक हे पुढील महिण्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित अभियंता यांनी प्रमाणित केल्यानंतर प्रत्यक्ष लॉगबुकातील किमी च्या आधारे निविदा निश्चित दराने देयके तयार करुन पुढील महिण्याच्या १० तारखेच्या आत लेखा विभागाकडे सादर करण्यात यावे. लॉगबुक व देयके प्रमाणित करुन सादर केल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार देयकाची अदायगी केली जाईल.
२७) वाहन भाडयाने कार्यरत कालावधीत वाहनावर आरोग्य सेवार्थ प्रणीत लिहण्यात यावा वाहन बंद झाल्यास खोडुन टाकणे अनिवार्य राहील. अन्यथा या प्रकरणी कार्यवाहीस आपली जवाबदारी राहील.
२८) भाडयाने वाहन घेण्याच्या प्रस्तावित अटीमध्ये पुर्णतः अथवा अंशतः बदल करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गोंदिया यांना राहतील.